# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date – 06 April 2024

# Time 7.10 AM to 7.20 AM

# Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०६ एप्रिल २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्जांची छाननी पूर्ण, आठ एप्रिलपर्यंत अर्ज मागे घेता येणार
- निवडणुकीसाठी काँग्रेसचा न्यायपत्र हा जाहीरनामा प्रसिद्ध
- देशाच्या न्यायिक क्षेत्रांमध्ये महिलांचं वाढतं प्रमाण ही खूप अभिमानाची बाब – सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांचं प्रतिपादन

आणि

- छत्रपती संभाजीनगर तसंच परभणी जिल्ह्यात मतदार जनजागृतीसाठी विविध कार्यक्रम

****

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांची छाननी काल पूर्ण झाली. यामध्ये राज्यातल्या आठ मतदारसंघात एकूण ३५२ पैकी २९९ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत.

नांदेड लोकसभा मतदारसंघात ६६, तर परभणी इथं ४१ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले. हिंगोली लोकसभा मतदार संघात ४८ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले. या मतदारसंघात विश्वनाथ भाऊराव फाळेगावकर या तृतीयपंथी उमेदवाराने अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला असून, त्यांचा हा अर्ज वैध ठरला असल्याचं, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी सांगितलं.

बुलढाणा लोकसभा मतदारसंघात २५, अकोला – १७, अमरावती – ५६, वर्धा – २६, तर यवतमाळ–वाशिम मतदरासंघात २० उमेदवारांचे अर्ज वैध ठरले.

दुसऱ्या टप्प्यात उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आठ एप्रिल ही असून, या मतदारसंघांसाठी २६ एप्रिलला मतदान होणार आहे.

****

लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं काल जाहीरनामा प्रसिद्ध केला. न्यायपत्र या नावानं हा जाहीरनामा काढण्यात आला असून, त्यात पाच न्याय आणि २५ गॅरंटीचा उल्लेख केला आहे. युवक, शेतकरी, महिला, आणि कामगार या वर्गांसाठी विविध घोषणा काँग्रेसनं यात केल्या आहेत. युवकांना रोजगार न मिळाल्यास वार्षिक एक लाख रुपये बेरोजगारी भत्ता, गरीब महिलांना वार्षिक एक लाख रुपये अर्थसहाय्य, शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि हमीभाव, मनरेगामार्फत किमान ४०० रुपये दररोज मजुरी, सामाजिक आणि आर्थिक समानतेसाठी जाति आधारित जनगणना, संवैधानिक संस्थांचं जतन, आदी मुद्द्यांचा या जाहीरनाम्यात समावेश आहे.

****

मतदानात मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी ग्रामीण आणि शहरी भागासाठी वेगवेगळा कृती आराखडा तयार करावा, असे निर्देश, मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिले आहेत. मतदानाचं प्रमाण अत्यल्प असलेल्या भागातल्या महापालिका आयुक्त आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची बैठक त्यांनी काल नवी दिल्लीत घेतली, त्यात ते बोलत होते. या बैठकीमध्ये राज्यातल्या मुंबई, नागपूर, पुणे, ठाणे या पालिकांचे आयुक्त सहभागी झाले होते. मतदान करण्याचा अभिमान वाटावा अशा प्रकारे जागृती करण्याचं आवाहन कुमार यांनी यावेळी केलं.

****

लोकसभा निवडणुकांसाठी प्रत्येक मतदारसंघात ‘महिला नियंत्रित मतदान केंद्र’ स्थापित करण्याचे आदेश निवडणूक आयोगानं दिले असून, राज्यात यावेळी ४४० मतदान केंद्रांचं नियंत्रण महिला करणार आहेत. छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड जिल्ह्यात प्रत्येकी २०, धाराशिव १६, बीड, हिंगोली आणि लातूर जिल्ह्यात प्रत्येकी सहा, जालना पाच, तर परभणी जिल्ह्यात चार मतदान केंद्र महिला नियंत्रित असणार आहेत.

****

मुंबईतल्या चेंबूर आणि गोवंडी विधानसभा मतदारसंघातल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या दोनशेहून जास्त पदाधिका-यांनी, काल भारतीय जनता

पक्षात प्रवेश केला. सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, भाजपा मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यावेळी उपस्थित होते.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेनं सलग सातव्यांदा रेपो दर साडे सहा टक्के ठेवला आहे. बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी २०२४–२५ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या पतधोरण समितीच्या आढावा बैठकीत ही माहिती दिली. बँकेत रक्कम जमा करण्यासाठीच्या यंत्रांमध्ये युपीआयचा वापर करून पैसे जमा करण्यासाठी रिझर्व्ह बँक लवकरच परवानगी देणार आहे. या सुविधेमुळे ग्राहकांची सोय, होईल आणि बँकांमध्ये पैसे हाताळण्याची प्रकिया अधिक कार्यक्षम होईल असं दास यांनी सांगितलं.

****

भारताच्या न्यायिक क्षेत्रांमध्ये महिलांचं प्रमाण वाढत असून, गेल्या दहा वर्षात अनेक महिला वकील उच्च न्यायालयामध्ये दाखल झाल्या आहेत, ही खूप अभिमानाची बाब असल्याचं, सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी म्हटलं आहे. नागपूर इथं काल मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या, शतकोत्तर समारंभात ते बोलत होते. कुठल्याही बार असोसिएशनची भूमिका ही न्यायालयामध्ये न्यायप्रक्रियेला सामान्य माणसाला सहज बनवण्याची असावी, असं सांगतानाच सरन्यायाधीशांनी, नागपूर बार असोसिएशन तर्फे चालवल्या जाणाऱ्या ‘न्याय दूत’, या निःशुल्क न्यायिक सहायता करणाऱ्या उपक्रमाचं कौतुकही केलं. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, माजी सरन्यायाधीश शरद बोबडे, नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे यावेळी उपस्थित होते.

****

सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गासाठीचं आरक्षण विचारात घेऊन नव्यानं आरक्षण निश्चिती करून, लवकरच परिक्षांच्या सुधारित तारखा जाहीर करण्यात येणार असल्याचं, महाराष्ट्र लोकसेवा आयोगानं कळवलं आहे. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरता आरक्षण अधिनियम, २०२४ मधल्या तरतुदीनुसार, २६ फेब्रुवारी, २०२४ पूर्वी जाहिरात प्रसिद्ध झालेल्या, किंवा जाहिरात प्रसिद्ध होऊन अर्ज मागवण्यात आले आहेत मात्र निवड प्रक्रिया सुरु झालेली नाही, अशा प्रकरणी, सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गाकरता आरक्षण विचारात घेऊन नव्यानं आरक्षण निश्चिती करून घेणं गरजेचं असल्यानं, आयोगानं हा निर्णय घेतला आहे.

****

मतदार जागृती कार्यक्रमाअंतर्गत छत्रपती संभाजीनगर इथल्या किराडपुरा भागातल्या, मनपा केंद्रीय प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी, काल रहीम नगर, बारी कॉलनी, किराडपुरा, सेंट्रल नाका या विभागात फेरी काढून जनतेला मतदान करण्याबाबत आवाहन केलं. यावेळी विद्यार्थ्यांनी मतदान जागृतीबाबत पथनाट्यही सादर केलं. याशिवाय, माझे आई बाबा मतदान करणारच, माझे आजी आजोबा मतदान करणारच, या घोषवाक्याचे फलक विद्यार्थ्यांनी आपापल्या परिसरात चिकटवले.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण इथं, पैठण आणि फुलंब्री विधानसभा क्षेत्रनिहाय केंद्राध्यक्ष आणि सहायक मतदान अधिकाऱ्यांचं प्रशिक्षण, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या उपस्थितीत पार पडलं. निवडणूक कामकाजाकडे सकारात्मकतेने पहा आणि कामकाज करा, अशा शब्दात जिल्हाधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित केलं.

****

परभणी लोकसभा मतदार संघाच्या ‘स्वीप’ कक्षामार्फत १८ वर्षावरील युवक-युवतींसाठी, मतदान जनजागृती आणि मतदानाची टक्केवारी वाढावी, या विषयावरील रिल्स तयार करण्याच्या स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

नांदेड लोकसभा मतदार संघ निवडणुकीच्या कार्यासाठी आता सज्ज झाला असून, पुढचे काही दिवस प्रशासन आणि पोलिसांनी अत्यंत दक्षतेनं एकत्रितपणे काम करावं, असं आवाहन, सर्वसामान्य निवडणूक निरीक्षक शशांक मिश्र यांनी केलं आहे. निवडणुकीच्या नियोजनासंदर्भात झालेल्या बैठकीत ते काल बोलत होते. जिल्ह्यातली कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती कठोरपणे हाताळण्याचे, आणि कोणत्याही परिस्थितीत आदर्श आचारसंहितेचं उल्लंघन होणार नाही याची काळजी घेण्याचे निर्देशही, मिश्र यांनी यावेळी दिले.

****

दरम्यान, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यात गुन्हेगारांच्या वीस टोळ्यांमधल्या साठ जणांना हद्दपार तर चौदा जणांना तुरुंगात स्थानबद्ध केलं आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्यात अवैध धंदे करणाऱ्या ८२ जणांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

****

बीड जिल्ह्यात पाणटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी काल माजलगाव धरणाची पाहणी केली. जिल्ह्यातल्या सर्वच तालुक्यात पाणीटंचाई असून, नीट व्यवस्थापन करून पाणीटंचाईच्या झळा नागरिकांना कमी पोहोचतील अशी व्यवस्था करण्याची सूचना त्यांनी यावेळी केली.

****

बीड जिल्ह्यात बाल विवाह निर्मूलन अभियान अतिशय दक्षतेनं राबवण्यात येत असून, यंदाच्या लग्नसराईत बाल विवाह लावून दिल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा, जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी सुधीर ढाकणे यांनी दिला आहे. मंगल कार्यालय मालक तसंच धार्मिक स्थळांच्या व्यवस्थापकांनी वधुवरांच्या वयाची खात्री कागदपत्रांवरून करून घ्यावी, असंही त्यांनी म्हटलं आहे. बाल विवाह होत असल्यास नागरिकांनी, एक शून्य नऊ आठ, या निशुल्क क्रमांकावर संपर्क साधण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

****

रासायनिक खतांच्या दुष्परिणामांबद्दल जागृती करण्यासाठी, आणि सेंद्रीय खतांची माहिती देण्यासाठी, विश्व संवाद केंद्राच्या ग्रामविकास गतीविधी अभियानाच्या वतीनं, गुडीपाडवा ते अक्षय्यतृतीया दरम्यान, भूमी सुपोषण अभियान राबवण्यात येणार आहे. या अभियानाचे देवगिरी प्रांत कार्यकारणी सदस्य भालचंद्र कानडे यांनी काल छत्रपती संभाजीनगर इथं ही माहिती दिली. या अभियानात सेंद्रीय खताची माहिती देणारे जनजागृतीपर कार्य़क्रम घेतले जाणार आहेत.

****

हिट अँड रन केस मध्ये अपघातग्रस्त झालेल्या व्यक्तीला नुकसान भरपाई देण्याबाबतचा निपटारा जलद व्हावा, असे निर्देश बीडच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी दिले आहेत. बीड इथं काल यासंदर्भातल्या बैठकीत त्या बोलत होत्या. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं यावर्षी १२ जानेवारीला दिलेला निर्णय सर्वच संबंधित यंत्रणांना लागू असून, या निर्णयाची नीट अंमलबजावणी व्हावी, अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या.

****

हवामान

राज्यात काल सर्वाधिक ४२ पूर्णांक सहा अंश सेल्सिअस तापमान चंद्रपूर इथं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात नांदेड, परभणी आणि धाराशिव जिल्ह्यात सरासरी ४१ अंश सेल्सिअस, बीड इथं ४०, तर छत्रपती संभाजीनगर इथं ३८ पूर्णांक सहा अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

दरम्यान, आजपासून येत्या नऊ तारखेपर्यंत मराठवाड्यात काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे.

****